| CNR No. **MHGO050006182018** | कालावधी | | |
|---|---|---|---|
| | वर्ष | महिने | दिवस |
| | ०७ | ०३ | २० |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी पी. एम. काजळे)**

**सं. फौ. ख. क्र. २९८/२०१८**
**निशाणी क्र. ३७/ब**
**तालुका पोलीस ठाणे, डुग्गीपार**

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष** | ] | महाराष्ट्र शासनमार्फत,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, डुग्गीपार,<br>ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. |
| **प्रतिनिधित्व** | ] | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ओ. एस. गहाणे |
| | | *–वि रु ध्द–* |
| **आरोपीं** | ] | **१. भिमराज इंसाराम राजगीरे,**<br>वय– ६० वर्षे, व्यवसाय– शेती,<br>**२. रेखा भिमराज राजगीरे,**<br>वय– ५४ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>**३. लोकेश उर्फ ललित भिमराज राजगीरे,**<br>वय– २७ वर्षे, व्यवसाय– खाजगी काम,<br>सर्व राहणार– सडक अर्जुनी, ता. सडक अर्जुनी,<br>जि. गोंदिया. |
| **प्रतिनिधित्व** | ] | विधिज्ञ श्री. व्ही. डब्ल्यु. गुप्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याची तारीख | :– | २२.१०.२०१८ |
| २) | प्रथम खबर अहवाल तारीख | :– | २२.१०.२०१८ |
| ३) | दोषारोप पत्र दाखल तारीख | :– | २६.११.२०१८ |
| ४) | दोषारोप/प्रतिकथन ठेवल्याची तारीख | :– | २५.०३.२०१९ |
| ५) | साक्षीपुरावा सुरु झाल्याची तारीख | :– | १०.०४.२०२४ |
| ६) | न्यायनिर्णयासाठी राखून ठेवलेली तारीख | :– | ........... |
| ७) | न्यायनिर्णयाची तारीख | :– | १८.०३.२०२६ |
| ८) | शिक्षा देणेची तारीख, जर असल्यास | :– | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षेचे वर्णन | फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | भिमराज इंसाराम राजगिरे, | ३०.१०.२०१८ | ३०.१०.२०१८ | भा. दं. वि. चे कलम २९४, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | -- |
| २) | रेखा भिमराज राजगिरे, | | | | | | |
| ३) | लोकेश उर्फ ललित भिमराज राजगिरे, | | | | | | |

## सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी

### अ) सरकार पक्ष :–

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | सुरेश डुडीराम राजगीरे | तक्रारकर्ता/फिर्यादी | १७ |
| २) | हरी तानबाजी राजगीरे | प्रत्यक्षदर्शी | १९ |
| ३) | महेश डुडीराम राजगीरे | प्रत्यक्षदर्शी | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| ४) | रोहीत अंताराम राजगीरे | पंच | २१ |
| ५) | देवेंद्र वसंत लांजेवार | पंच | २३ |
| ६) | शिवलाल किसन धावळे | तपास अधिकारी | २५ |

**ब)** **<u>बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास</u> :– निरंक.**

**क)** **<u>न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास</u> :– निरंक.**

**<u>सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालया तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी</u>**

**अ)** **<u>सरकार पक्ष</u> :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे विवरण | दस्तऐवजास निशाणी देण्यात आलेल्या साक्षीदाराचा क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | १८ | तक्रार | स.सा.क्र. १ |
| २) | २६, २७ ते २९ | घटनास्थळ पंचनामा व आरोपी क्र. १ ते ३ यांचे अटक फार्म. | स.सा.क्र. ६ |

**ब)** **<u>बचाव पक्ष</u> :– निरंक.**

**क)** **<u>न्यायालयातर्फे निशाणी</u> :– निरंक.**

**ड)** **<u>जप्त मुद्देमाल / वस्तु वर्णन</u>:-**

| अ. क्र. | वस्तुंचा नंबर | वस्तूंचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्या य नि र्ण य व आ दे श

**(दिनांक १८ मार्च २०२६ रोजी पारीत)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे खटला चालला आहे.

**अभियोग पक्षाचे प्रकरणाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे –**

०२] तक्रारदारची शेती त्यांचे आईने आरोपींना वट्याने करण्यासाठी दिली होती. त्यानंतर त्यांची आई मयत झालेनंतर त्यांनी आरोपींकडे शेती परत मागितली, परंतु आरोपींनी परत दिली नाही. त्यामुळे तक्रारदार याने जमीनीचा ताबा न्यायालय मार्फत घेतला, त्यानंतर तक्रारदार हे शेतीची मेहनत मशागत करत होता. परंतु आरोपीं हे नेहमी हरकत अडथळे करत होते. त्यानंतर दिनांक २२/१०/२०१८ रोजी दुपारी ०२:०० वाजेच्या दरम्यान तक्रारदार, त्याचा लहान भाऊ महेश राजगिरे, काका हरी राजगिरे धानाचे पेंढया बांधत होते. त्यावेळी आरोपी हे त्यांना पाहून म्हणाले की, शेतीची जागा आमची आहे, तुमची नाही असे म्हणून शिवीगाळ केली, तसेच म्हणाले की, "साल्या मादरचोदा, साल्या भोसळीच्या, तुझ्या बहिणीला मायला हेपो अश्या प्रकारची अश्लील शिवीगाळ केली. आरोपीनी साल्या भोसळीच्या ढोबरी फोड असे म्हणून काठीने मारहाण केली, ढकलढुकल केली. त्यामुळे तक्रारदारचे पायाला, तक्रारदारचे काकाचे डाव्या हाताला, उजव्या पायाला, खरचटले. त्यामुळे आरोपीं १ ते ३ विरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून भारतीय दंड विधान कायदा कलम २९४, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा नंबर २६४/२०१८ हा नोंदविण्यात आला.

०३] सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार शिवलाल धावडे याने केला. तपासादरम्यान त्याने घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा केला, गुन्हयाच्या तपशीलाचा नमुना केला. आरोपींना अटक केले. फिर्यादी व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तसेच तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४

सह ३४ प्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४]** आरोपी क्र. १ ते ३ न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे निशाणी क्र. १३ वर अपराधाचा तपशील नोंदविला. सदर तपशील आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजवुन सांगण्यास आला. त्यांनी सदर अपराधाचा तपशील मान्य नसल्याचे व प्रकरणाची संपरिक्षा करण्यात यावी असे प्रतिपादन केले. अभियोग पक्षाचा पुरावा झाल्यानंतर आरोपी क्र. १ ते ३ यांची फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे (नि.क्र. ३४ ते ३६) वर जबाब नोंदविण्यात आला व आरोपींना गुन्हयाशी संबंध दाखविणारे सर्व परिस्थिती बाबत प्रश्न विचारण्यात आले. आरोपींनी बचावामध्ये अभियोग पक्षाची संपुर्ण हकीकत नाकारली आहे.

**०५]** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक अभियोक्ता श्री. ओ. एस. गहाणे व आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. डब्ल्यु. गुप्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६]** अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व आरोपींचा बचाव लक्षात घेता प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझ्या समक्ष उपस्थित होतात सदर मुद्दे, त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दिनांक २२/१०/२०१८ रोजी दुपारी ०२:०० वाजेच्या सुमारास मौजे सडक अर्जुनी, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी तक्रारदाराला अश्लील शिवीगाळ केली व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम २९४ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | |
| २ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वरील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने तक्रारदार व साक्षीदारांना | |

| | | |
|---|---|---|
| | स्वईच्छेने काठीच्या सहाय्याने दुखापत केली व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वरील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचा समान उद्वेश साध्य करण्याच्या उद्वेशाने तक्रारदार व साक्षीदारांना शिवीगाळ करून सार्वजनिक शांतेचा भंग केला व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमाक १ ते ३ करिता –**

**०७]** सदर मुद्दे हे आरोपींनी त्यांचा समान उद्वेश साध्य करण्याच्या उद्वेशाने आरोपींनी तक्रारदार व साक्षीदारांना स्वईच्छेने काठीच्या सहाय्याने दुखापत केली व सार्वजनिक ठिकाणी तक्रारदाला अश्लील भाषेत शिवीगाळ करून सार्वजनिक शांतेचा भंग केल्याबाबत असल्यामुळे त्यावरील अभियोग पक्षाचा पुरावा देखील सारखाच आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ ची कारणमीमांसा एकत्र करणे सोईस्कर होईल. सबब, मुद्दे क्र १ ते ३ ची कारणमीमांसा एकत्रित करीत आहे.

**०८]** अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला एकंदर पुरावा व आरोपीं तर्फे उपस्थित करण्यात आलेला बचाव याचा विचार करता असे दिसून येते की, दिनांक २२/१०/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास मौजे सडक अर्जुनी, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे आरोपींनी तक्रारदार व साक्षीदारांना स्वईच्छेने काठीच्या सहाय्याने दुखापत केली व सार्वजनिक ठिकाणी तक्रारदाला अश्लील भाषेत शिवीगाळ करून सार्वजनिक शांतेचा भंग केला हि बाब अभियोग पक्षातर्फे सिद्ध करण्यात आली आहे किवा कसे हे पाहणे

आवश्यक आहे.

०९] सरकार पक्षाने गुन्हा सिद्ध करण्यासाठी एकूण ६ साक्षीदार तपासलेले आहे. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी सुरेश राजगिरे (अ.सा.क्र.१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादी, त्यांचा भाऊ महेश राजगिरे व काका हरी राजगिरे हे त्यांच्या शेतात धानाचे पेंढे बांधण्याचे काम करीत असताना आरोपीं तेथे आले. त्यांनी "ही शेती आमची आहे" तुझ्या बहिणीला मायला हेपो" अश्या प्रकारची अश्लील शिवीगाळ केली. आरोपीनी ढोबरी फोड असे म्हणत फिर्यादी व त्याच्या नातेवाईकांना अत्यंत अश्लील व अपमानास्पद शब्दांत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी काठीने मारहाण करून ढकलाढकली केली, ज्यामुळे फिर्यादी व त्याच्या काकाला किरकोळ दुखापती झाल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेवरून आरोपींविरुद्ध सदर गुन्हा नोंदविण्यात आला. मात्र, संपूर्ण पुराव्याचे बारकाईने परीक्षण केल्यास असे दिसून येते की, प्रस्तुत साक्षीदार हा घटनेचा पिडीत आहे. त्याला घटनेची तारीख, वार व वेळ सांगता आलेली नाही. तसेच त्याला घटनास्थळ देखील सांगता आलेले नाही. त्याचे कथनानुसार घटना ही त्याचे शेतात घडली होती तर त्याला त्याचे स्वतः चे शेताचा गट नंबर सांगता आलेला नाही. घटना स्थळ हे सार्वजनिक ठिकाण होते हे देखील त्याला सांगता आलेले नाही. भारतीय दंड संहिता कलम २९४ अन्वये गुन्हा सिध्द करण्याकरिता घटनास्थळ हे सार्वजनिक असणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुत घटनास्थळ हे सार्वजनिक असल्याचे स्पष्ट झालेले नाही. तसेच त्याला मारहाण झालेली होती असे तो सांगतो, मात्र त्याला कशा स्वरूपाच्या दुखापत झाली हे सांगता आलेले नाही. तसेच तक्रारदार व आरोपी यांचे मध्ये शेतीवरून देखील पूर्वीपासून वाद असल्याचे दिसून येते.

१०] फिर्यादी सुरेश राजगिरे यांच्या साक्षीचा विचार करता, त्यांनी घटनेचे सविस्तर वर्णन करून आरोपींनी अश्लील शिवीगाळ व काठीने मारहाण केल्याचे नमूद केले आहे. तथापि, उलटतपासात त्यांनी स्वतः च्या शेतीचा गट क्रमांक सांगता आला नाही, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे कारण यामुळे त्यांच्या शेतीवरील प्रत्यक्ष ताबा व घटना नेमकी कोणत्या ठिकाणी घडली याबाबत शंका निर्माण होते. पुढे त्यांनी मारहाणीसाठी वापरलेल्या काठीचा

उल्लेख केला असला तरी ती काठी तपासादरम्यान जप्त करून न्यायालयात सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांच्या कथनाला कोणत्याही भौतिक पुराव्याची जोड मिळत नाही. शिवाय, त्यांच्या व आरोपींमध्ये पूर्वीपासून शेतीच्या वादाचे कारण असल्यामुळे त्यांची साक्ष ही स्वारस्यपूर्ण असून ती स्वतंत्र पुराव्याने पुष्टी होणे आवश्यक होते, जे येथे झालेले नाही. त्यामुळे त्याची साक्ष ही आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

**११]** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार हरी राजगिरे (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षीकडे पाहता, त्यांनी फिर्यादीच्या कथनास अनुसरून आरोपींनी शिवीगाळ व मारहाण केल्याचे सांगितले आहे. त्यांनी आरोपींनी काठीने मारहाण केली तसेच आरोपीं क्रमांक २ ही त्यांच्या छातीवर बसून बुक्क्यांनी मारहाण केली असे नमूद केले आहे. तथापि, त्यांनी घटनेचे ठिकाण सार्वजनिक असल्याचे स्पष्ट केलेले नाही, जे भारतीय दंड विधान कलम २९४ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक आहे. पुढे त्यांनी स्वतःला झालेल्या दुखापतींचे नेमके स्वरूप, त्या दुखापती गंभीर की किरकोळ, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नाही. त्याचप्रमाणे त्यांनी देखील कथित काठीची ओळख पटविलेली नाही व ती न्यायालयासमोर सादर झालेली नाही. त्यामुळे त्यांची साक्ष केवळ फिर्यादीच्या कथनाची पुनरावृत्ती असून स्वतंत्र व ठोस पुरावा म्हणून ग्राह्य धरता येत नाही.

**१२]** अभियोग पक्षाचा साक्षीदार महेश राजगिरे (अ.सा.क्र.३) यांनी देखील फिर्यादी व साक्षीदार नंबर २ यांच्या साक्षीस अनुसरून साक्ष दिली आहे. त्यांनी आरोपींनी शिवीगाळ व मारहाण केल्याचे नमूद केले असले, तरी त्यांच्या साक्षीतही तशाच प्रकारच्या त्रुटी आढळतात. त्यांनी घटना सार्वजनिक ठिकाणी घडली हे सांगितलेले नाही. त्यांना झालेल्या दुखापतींचे स्वरूप, त्यासाठी वैद्यकीय उपचार घेतले का, याबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तसेच त्यांनी देखील काठी ओळखलेली नाही. त्यामुळे त्यांची साक्ष ही केवळ समर्थनात्मक स्वरूपाची असून स्वतंत्र विश्वासार्हता निर्माण करण्यात अपयशी ठरते.

१३] साक्षीदार रोहित राजगिरे (अ.सा.क्र.४) व साक्षीदार देवेंद्र लांजेवार (अ.सा.क्र.५) हे पंच साक्षीदार असून त्यांनी सरकार पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यास समर्थन न दिल्यामुळे घटनास्थळाची सत्यता, त्याचे स्वरूप व ते सार्वजनिक होते की नाही हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष अपयशी ठरला आहे. पंच साक्षीदारांचा असा निष्क्रिय दृष्टिकोन हा प्रकरणातील एक गंभीर त्रुटी मानली जाते, कारण पंचनाम्याच्या माध्यमातून घटनास्थळाची परिस्थिती व पुरावे सिद्ध करणे आवश्यक असते. मात्र ते सपक्ष झालेले नाही.

१४] तपास अधिकारी धावळे (अ.सा.क्र.६) यांनी तपासाची संपूर्ण कार्यवाही जसे की, घटनास्थळ पंचनामा, जप्ती, साक्षीदारांचे जबाब नोंदविणे, आरोपींना अटक करणे इत्यादी बाबी सांगितल्या आहेत. तथापि, त्यांच्या साक्षीने केवळ तपासाची प्रक्रिया स्पष्ट होते, परंतु गुन्हा घडल्याचे ठोस पुरावे उपलब्ध होत नाहीत. विशेष म्हणजे, त्यांनी जप्त केलेली काठी न्यायालयासमोर सादर करण्यात आलेली नाही किंवा ती साक्षीदारांनी ओळखलेली नाही. तसेच, तपास अधिकाऱ्याने जखमी व्यक्तींना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविल्याचे नमूद केले असले, तरी त्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही व वैद्यकीय प्रमाणपत्र देखील पुराव्यात सिद्ध झालेले नाही. त्यामुळे दुखापतींचा कोणताही अधिकृत व विश्वसनीय पुरावा उपलब्ध झालेला नाही. तसेच तपासी अधिकारी यांनी देखील सदर घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण होते यावर प्रकाश टाकलेला नाही.

१५] याशिवाय, प्रकरणात कोणताही स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध नाही. सर्व साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक असून त्यांची साक्ष स्वाभाविकपणे पक्षपाती ठरते. अशा परिस्थितीत त्यांच्या साक्षीस ठोस व स्वतंत्र पुष्टी आवश्यक असते, जी या प्रकरणात पूर्णपणे अनुपस्थित आहे. तसेच आरोपींनी देखील या घटनेबाबत फिर्यादीविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचे नमूद झाले असून, त्यातून दोन्ही पक्षांमध्ये वाद असल्याचे दिसून येते, ज्यामुळे फिर्यादीच्या कथनाबाबत अधिक शंका निर्माण होते.

१६] वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता असे स्पष्ट होते की, कथित हत्यार (काठी) सिद्ध झालेले नाही, वैद्यकीय पुरावा उपलब्ध नाही, पंच साक्षीदारांनी साथ दिलेली नाही, घटना सार्वजनिक ठिकाणी घडल्याचे सिद्ध झालेले नाही, साक्षीदारांच्या साक्षीत ठोसपणा व सुसंगतीचा अभाव आहे, व स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव आहे. या सर्व त्रुटींमुळे सरकार पक्ष आरोपींविरुद्धचा गुन्हा शंकातीतरीत्या सिद्ध करण्यात पूर्णतः अपयशी ठरतो. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात आरोपींना दोषी ठरविण्यासाठी आवश्यक असलेला विश्वासार्ह, सुसंगत व ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने आरोपींना लाभाचा संशय देणे आवश्यक ठरते. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ करिता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र.१ **भिमराज इंसाराम राजगीरे**, आरोपी क्र. २ **रेखा भिमराज राजगीरे** व आरोपी क्र. ३ **लोकेश उर्फ ललित भिमराज राजगीरे** यांची फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४ सह ३४ वरील दंडनीय अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २ | आरोपींचे जामिन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येतात. |
| ३ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे अपील कालावधी पर्यन्त वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). | |

Digitally signed by PRIYANKA MACHINDRA KAJALE
Date: 2026.03.18 18:24:14 +0530

**ठिकाण – सडक अर्जुनी.**
**दिनांक – १८.०३.२०२६**

**(पी. एम. काजळे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**सडक अर्जुनी.**

**दाखला**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | राहुल दिगंबर भुजाडे<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नाव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सडक अर्जुनी, |
| आदेश/न्यायनिर्णय जाहीर केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| मा. पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |